**कालमर्यादा /महत्वाचे**

**क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१८/पोनि/०१ /२०१९**
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :02 /02/२०१९.

संदर्भ :- १) सन-२०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, दि. २५/०६/२०१४ व,
२) सन-२०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, दि. ०६/०४/२०१५.

विषय :- **सार्वत्रिक बदल्या-२०१९ करिता माहिती पाठविण्याबाबत.**
तांत्रीक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या.

*** *** ***

**परिपत्रक:-**

तांत्रीक शाखेतील पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने संदर्भाधिन अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

१) दि. ३१/०५/२०१९ पर्यत, किंवा त्यापुर्वी तांत्रीक शाखेतील कार्यरत संवर्ग निहाय पोलीस उपनिरीक्षक/ पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश-२०१५) एके ठिकाणी विहित कालावधी पूर्ण झाला असेल, त्या पोलीस उपनिरीक्षक, व पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी, तसेच विहीत कालावधी पूर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज संवर्गनिहाय पोलीस अधिकारी यांची माहिती संबंधीत घटक प्रमुखांच्या शिफारशीसह माहिती पाठवावी.

२) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी यांचे प्रकरणी चौकशी करुन त्यांचें चौकशी अहवालासह बदलीबाबतचे संवर्गनिहाय स्वतंत्र प्रकरणे संबंधित घटक प्रमुखांनी त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावेत. जेणेकरुन, पोलीस आस्थापना मंडळ क्रं.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्याबात उचित निर्णय घेण्यात येईल.

३) दि.०१/०२/२०१९ पूर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज / प्रतिकूल अहवाल इत्यादी या परिपत्रकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वानी नोंद घ्यावी, व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २(६A) नुसार पोलीस अधिका-यांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी एप्रिल महिन्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमुद केल्याप्रमाणे पोलीस अधिका-यांच्या बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्रं.२ यांच्याकडून त्या कालावधीत करणे सुलभ होण्याच्या

दृष्टीकोनातुन, सर्व संबंधीत घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे १) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी, २) मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज तसेच, ३) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाच्या पोलीस अधिका-यांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात विहीत कालमर्यादेत **दि.२८/०२/२०१९ पूर्वी न चुकता पाठवावी.** यामध्ये कोणत्याही पोलीस अधिका-यांची माहिती पाठवावयाची राहून गेल्यास त्यास संबंधीत घटक प्रमुख हे जबाबदार राहतील. दि.२८/०२/२०१९ नंतरच्या अर्जाबाबत विचार केला जाणार नाही, याची समज सर्व अधिका-यांना लेखी स्वरुपात देण्याची जबातदारी संबंधीत घटकप्रमुखांची आहे.

५) घटक प्रमुखांनी सदरची माहिती पाठवितांना,

(१) पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांविरुध्द न्यायालयीन प्रकरण / विभागीय चौकशी किंवा एखादे अन्य प्रकरण प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे, किंवा सध्या यापैकी कोणी एखादी शिक्षा भोगत असल्यास सदरची शिक्षा केव्हा सुरु झाली व ती केव्हा संपणार, इत्यादिं बाबतचा सविस्तर अहवाल सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावा.

(२) पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांच्या मागील १० वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी सोबतच्या विवरणपत्रात भरुन पाठवावी.तसेच,

(३) घटक प्रमुखांनी सदरची माहिती **Word Sheet मध्ये DVBW-TTSurekh (ISM V6) मध्येच** मराठीत टंकलिखीत करुन, परिपत्रकासोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन, बिनचूक सेवातपशिलांची विवरणपत्रे ही "प्रत्येकी एक" या प्रमाणे राखीव पोलीस निरीक्षक, आयुधिक पोलीस निरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षकांची माहिती तसेच राखीव पोलीस उपनिरीक्षक, आयुधिक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक (अभि/वाह), व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षकांची माहिती पेन ड्राईव्ह वर तसेच हार्ड कॉपी या कार्यालयातील **का.क्र.३-अ** मध्ये दि. २८/०२/२०१९ पूर्वी निश्चितपणे पाठवावी. अन्य फॉन्टमध्ये प्राप्त झालेली माहिती ह्या कार्यालयातील संगणकावर उपलब्ध नसल्याने, ती भरण्यासाठी अधिक कालावधी लागत असल्याने, अशी माहिती स्विकारणे शक्य होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

६. आगामी काळात लोकसभा निवडणूक होणार असल्याने सदरच्या बदल्या निवडणूक आयोग यांचे पूर्व परवानगीने अथवा निवडणूकीची आचारसंहिता समाप्त झाले नंतर होणार असल्याने सार्वजनिक बदल्या होण्यास विलंब होण्याची शक्यता आहे.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, बहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा.,मुंबई
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह, बृहन्मुंबई वगळून)
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र/ कोल्हापूर परिक्षेत्र/ नाशिक परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र/ अमरावती परिक्षेत्र / नांदेड परिक्षेत्र/ औरंगाबाद परिक्षेत्र
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, सिव्हिल लाईन्स, नागपूर
अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस नायगांव, बृहन्मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक,
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे

२. अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त घटक कार्यालयाकडून माहिती संकलित करुन त्यांचे अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावी.

प्रत,

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई.

२. सदरचे परिपत्रक http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर Flash या शिर्षाखाली Information of RPI/MT/WL for General Transfer-२०१९ या मथळ्याखाली पुढील एक महिन्यासाठी सत्वर प्रसिध्द करावे.

## नमूना - विवरणपत्र

सवंर्गनिहाय पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१९

| अ.क्र. | पोनि यांचे नाव, सध्याची नेमणूक, मूळ जिल्हा, सेवानिवृत्ती दिनांक | सेवातपशिल | विनंती अर्ज किंवा शिफारस असल्यास घटक प्रमुखांचे अभिप्राय (अभिप्राय देतांना विनंतीमध्ये नमूद बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, याबाबत अभिप्राय नमूद करावेत, फक्त शिफारस करु नये.) |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| | नाव :<br><br>सध्याची नेमणूक :<br><br>मूळ जिल्हा :<br><br>सेवानिवृत्तीचा दिनांक : | **पोउपनि**<br>दि. ते कार्यालयाचे नाव<br><br>**पोनि** | विनंतीची ठिकाण :-<br><br>**विनंतीचे थोडक्यात कारण**<br><br>१. पोलीस निरीक्षकांविरुध्द न्यायालयीन प्रकरण / विभागीय चौकशी किंवा एखादे अन्य प्रकरण प्रस्तावित / प्रलंबित आहे किंवा कसे, किंवा सध्या यापैकी कोणी एखादी शिक्षा भोगत असल्यास, सदरची शिक्षा केव्हा सुरु झाली व ती केव्हा संपणार, इत्यादिं बाबतचा सविस्तर अहवाल कळवावा.<br>२. पोलीस निरीक्षकांच्या मागील १० वर्षांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी खालीलप्रमाणे भरुन पाठवावी. |

| २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ |
| | | | | |

(घटक प्रमुखांची स्वाक्षरी)